### ६) ओळख स्पर्शाची...

लहान मुलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन मुले, पालक आणि संस्थाचालक यांच्यामध्ये त्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आहे.

पहिली ते आठवीच्या मुलांना चांगल्या व वाईट स्पर्शाची ओळख करून देऊन वाईट स्पर्शाला प्रतिकार कसा करावा, हे यात सांगितले जाते. या कार्यशाळेत विविध गोष्टी, कृतिखेळ, पुस्तिका, दृकश्राव्य माध्यमाचा वापर केला जातो. मुलांच्या आणि पालकांच्या मार्गदर्शनासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिका यांच्या साहाय्याने 'बालसंवाद कट्टा' ही मोफत सेवा उपलब्ध झालेली आहे.

अंजली भिडे – ९८५०७१७१२४

### ७) विकासिका

दहा ते बारा वयोगटातील विद्यार्थ्यांचे स्व–भान व सामाजिक भान वाढविणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. 'सामर्थ्य सवयींचे, निर्णय कौशल्य, निरीक्षण कौशल्य, रंग भावनांचे, सुरक्षा' असे विषय कृतिखेळ, गोष्टी, प्रसंग या माध्यमांच्या मदतीने मुलांपर्यंत पोहोचवले जातात.

मुलांमध्ये देशप्रेम आणि आदर वाढावा म्हणून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने 'भारत माझा देश आहे' या शालेय प्रतिज्ञेचा अर्थ व इतिहास गोष्टी, उदाहरणे देऊन विविध शाळांमध्ये, गावांमध्ये पोहोचवला जातो. विनोबा भावे लिखित 'सप्तशक्ती' या विषयावरील संवादरूपी सादरीकरण गट सदस्या विविध ठिकाणी करत असतात. प्रसंगानुरूप काही विषयांचा, व्यक्तींचा अभ्यास व त्याचे संकलन हा गट करत असतो.

साधना सेठिया – ९४०४४१९४३७

### ८) कौशल्य विकास

१२ ते १६ वयोगटातील मुलामुलींमध्ये जीवन कौशल्य (Life skill) रुजवणे या हेतूने हा गट काम करतो. ही स्किल्स मुलांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करतात. सॉफ्ट स्किल्स आत्मसात केल्याने वृत्तीत चांगला फरक पडतो. हे किशोर वयातच रुजवणे आवश्यक आहे. त्यासाठी कृतिखेळ, गटचर्चा, रोल प्लेच्या माध्यमांद्वारे मुलांना मार्गदर्शन केले जाते.

ज्या मुलांची सत्रं घेतली जातात, त्या मुलांच्या पालकांशीदेखील संवाद साधला जातो. उपक्रमात संवाद, अभ्यासाची पूर्वतयारी, प्रश्न, निरीक्षण, निर्णय, विचार यांमधील कौशल्ये यांबरोबरच स्वयं शिस्त– ध्येय निश्चिती, वेळेचं नियोजन, दिल–दोस्ती, भावनांची ओळख व नियमन, गटकार्य – सहकार्य, असे विषय समाविष्ट आहेत.

ज्योती दीक्षित – ९८५०२३११६६

### ९) संवादिनी विस्तार:

संवादिनी – शिरूर – २०१८ पासून सुरू
संवादिनी – राजगुरूनगर –२०२१ पासून सुरू

### १०) अभ्यास दौरे

स्व–प्रेरणा बळकट व्हावी म्हणून देशातील विविध प्रांतामधील, सामाजिक कार्याचा व समाजमनाचा अभ्यास करणे, ऐतिहासिक वारसा समजून घेणे, आचारविचारांची देवाणघेवाण करणे, अशा अनेक हेतूंनी दर तीन वर्षांनी अभ्यासदौरा योजला जातो. यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढते. आत्तापर्यंत विदर्भातील सेवा प्रकल्प, गुजरातमधील संस्था, ईशान्य भारत, दक्षिण भारत असे अभ्यास दौरे झाले; याच बरोबर सामाजिक काम करण्यासाठीची प्रेरणा वाढीस लागेल अशा संस्थांना भेटी देऊन त्यांचे काम समजून घेतले जाते.

### विशेष उल्लेखनीय सहभाग / योगदान

- २०१९–२० हे वर्ष संवादिनीचे द्विदशकपूर्ती वर्ष म्हणून विविध उपक्रम करून साजरे केले गेले. उदा. चक्री उपासना
- 'निरामय' संस्थेच्या दरवर्षी होणाऱ्या वस्ती विभागातील मुलींसाठीच्या शिबिरात २०१६ पासून सक्रिय सहभाग.
- स्वरूपवर्धिनी संस्थेच्या कार्यकर्त्यांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणे आणि कार्यशाळांचे आयोजन.
- २०२२–२३ मधे 'जेंडर सेन्सिटायझेशन' या विषयावर पोलिसांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा.
- ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिका विभागाबरोबर 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' आणि 'ओळख स्पर्शाची' या विषयांवर 'युवा साथी', 'संयम', 'GTBT ३६०' सारखे मोठे प्रकल्प.

**स्त्रीशक्तीच्या प्रबोधनाचे । ध्येय आपुले संतुलनाचे ।**
**समन्वयाचे सहभगाचे । समुन्नतीचे सुखवृद्धीचे**

### संवादिनी उपक्रमात सहभागी होण्यासाठी संपर्क

**संवादिनी – (मध्यवर्ती, सदाशिव पेठ, पुणे)**
०२० – २४२०७२२२, ९६०४०३३९८३

**संवादिनी – (शिरूर)**
९४०४४१९४३७

**संवादिनी – (राजगुरुनगर)**
९३७१०२०६४४

**संवादिनी – (पुणे केंद्र, पौड रस्ता)**
९८९०४५५७६५, ९८८१३०८५५७

**संवादिनी – (पुणे केंद्र, औंध)**
९८९०४५५७६५, ९८९०१५५४१२

**संवादिनी – (भाईंदर केंद्र)**
९८९०४५५७६५, ९८३३९१८५६७

**संवादिनी – (सोलापूर केंद्र)**
९८९०४५५७६५, ९७६६२६८०५८

**संवादिनी – (डोंबिवली केंद्र)**
८६५५७६८३४९, ९२२२२९९७७९

**संवादिनी – (ठाणे केंद्र)**
८१०८०००५७४, ९८६९६८४७११

## ज्ञान प्रबोधिनी
## स्त्री–शक्ती प्रबोधन

# संवादिनी

**स्वयंविकासातून समाजपरिवर्तन**

आयुष्यात येणाऱ्या वेगवेगळ्या वळणांना सामोरे जात, आपल्या कुटुंबाला मानसिक, भावनिक आणि आर्थिक आधार देत, पुढे वाटचाल करत असताना अनेक महिलांना स्वतःसाठी आणि स्वतःपलीकडच्या समाजासाठी निरपेक्षपणे काही करावे, कुटुंबाचा परीघ वाढवावा, आपल्यासारख्याच समविचारी मैत्रिणींसोबत काही काम करावे असे वाटू लागते. स्वतःच्या क्षमतांना ओळखून त्यांना न्याय द्यावा आणि थोडे वेगळ्या वाटेने जावे असा विचार मनात येऊ लागतो. अशा सर्व मैत्रिणींसाठी 'संवादिनी' हे खुले दालन आहे.

'स्वयं विकासातून समाज परिवर्तन' हे ध्येय मनाशी धरून आपण संवादिनीच्या वाटचालीत सामावून जाऊ शकता.

आपापल्या वेळेच्या उपलब्धीनुसार आपण संवादिनीच्या वेगवेगळ्या उपक्रमांत सहभाग घेऊ शकता.

### संवादिनीची उद्दिष्टे :

१) स्त्रियांमधील आत्मभान (स्व जाणीव) आणि आत्मसन्मानाची (स्वआदर) भावना बळकट करण्यासाठी संवादिनीचे व्यासपीठ वापरणे.
२) संवादिनीच्या माध्यमातून संपर्कात येणाऱ्या महिलांचे संघटन करणे.
३) समाजातील कुटुंब जीवनाच्या गुणवत्तेचा अभ्यास करून ती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
४) विविध वयोगटांतील स्वयंसेवी वृत्तीच्या व्यक्तींची 'कार्यकर्ता घडण ते नेतृत्व घडण' ही प्रक्रिया अधिक समृद्ध करणे.
५) संवादिनीतील व संवादिनी व्यतिरिक्तच्या विविध वयोगटातील महिलांचे मानसिक आरोग्य जोपासण्यासाठी ठोस प्रयत्न करणे.
६) सुदृढ समाज घडण व्हावी म्हणून विविध वयोगटांसाठी प्रबोधनात्मक तसेच कौशल्य विकासाच्या उपक्रमांची मांडणी व उपयोजन करणे.

## दृष्टिक्षेपात संवादिनी

इ. स. २००० मध्ये सामाजिक हितासाठी स्वत:चा वेळ देऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांचे एकत्रीकरण (गट बांधणी) हा हेतू मनात ठेवून संवादिनीची सुरुवात झाली. 'स्वयंविकासातून समाज परिवर्तन' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संवादिनी अंतर्गत चालणारे उपक्रम:

- अत्यंत नियमितपणे चालणारी 'संवादिनी' मासिक बैठक.
- उमलत्या वयाशी जुळवून घेताना – वयात येणाऱ्या मुला-मुलींसाठी लैंगिकता प्रशिक्षण.
  - ➢ बहर जोपासताना –पालकांसाठी कार्यशाळा.
  - ➢ तरुणाईची आव्हाने – महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य कार्यशाळा.
  - ➢ सहजीवनाच्या उंबरठ्यावर – तरुणांसाठी विवाहपूर्व मार्गदर्शन.
- ओळख स्पर्शाची – लैंगिक शोषण विरोधी जाणीव जागृती कार्यशाळा – इ. १ ली ते ७वी वयोगटासाठी
- पालवी– वंचित गटातील मुलांना शिक्षणपूरक कृतीतून मार्गदर्शन.
- विद्याव्रत संस्कार – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाला चालना देणारा उपक्रम.
- विकासिका – दहा ते तेरा या वयोगटातील मुला मुलींना, 'स्व-भान व सामाजिक भान' यासाठी मार्गदर्शन.
- कौशल्य गट– बारा ते सोळा या वयोगटातील विद्यार्थ्यांना जीवन कौशल्यांविषयी मार्गदर्शन.
- समतोल द्वैमासिक – समृद्धी आणि समानतेने युक्त अशा संतुलित समाजासाठी चिंतनशील आणि वैचारिक लेखन.
- अभ्यास दौरा – स्व-प्रेरणा बळकट व्हावी म्हणून देशभरातील विविध कार्यांचा जवळून अभ्यास
- 'संवादिनी' उपक्रम कुठे कुठे चालतो? – ज्ञान प्रबोधिनी, सदाशिव पेठ-पुणे, पुणे केंद्र – पौड रस्ता आणि औंध, शिरूर, राजगुरुनगर, बोरिवली केंद्र, सोलापूर केंद्र, ठाणे केंद्र, डोंबिवली केंद्र, भाईंदर केंद्र.
- प्रदीर्घ बैठक– संवादिनीच्या विविध उपक्रम गटांमध्ये काम करणाऱ्या सदस्या दरवर्षी एकदा एकत्र जमतात. आधीच्या वर्षाचा आढावा, पुढच्या वर्षीच्या कामाचे नियोजन, प्रबोधिनीतील ज्येष्ठांचे मार्गदर्शन, काही मनमोकळ्या गप्पा यातून संघटन बळकट होते. कामासाठी ऊर्जा मिळते आणि नव्याने काम करण्यासाठी सदस्या सज्ज होतात.
- साप्ताहिक उपासना: दर मंगळवारी संवादिनी कक्षात दुपारी ३.३० ते ४ या वेळेत ज्ञान प्रबोधिनीची संपूर्ण उपासना केली जाते.
- २०२३पासून उपक्रमात सक्रिय सहभागी असणाऱ्या सदस्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी समूहगुण कार्यदिशेच्या मदतीने समूहगुण प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते.

## उपक्रम माहिती...

### १) मासिक बैठक

संवादिनी स्थापनेच्या दिवसापासून दरमहा अखंडपणे सुरू असलेला मासिक बैठक हा प्रमुख पायाभूत उपक्रम आहे. संवादिनीच्या कामात येण्यासाठीचे हे प्रमुख प्रवेशद्वार आहे. 'संघटना' हा प्रमुख हेतू असल्याने संवादिनीच्या गटबांधणीसाठी मासिक बैठकीचा उपयोग होतो.

दरमहा होणाऱ्या बैठकांमुळे तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळते, स्वत:च्या विचारांबद्दल स्पष्टता, एखाद्या विषयाची अथवा माहितीची देवाण-घेवाण, जाणीव जागृती, जाणीव व्यापकता साध्य होते. नवीन येणाऱ्या मैत्रिणींशी सुसंवाद साधला जातानाच सदस्यांची स्वजाणीव आणि आत्मविश्वास यात लक्षणीय बदल होतो.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी होणाऱ्या या बैठकांमध्ये – सामाजिक बांधिलकी, व्यक्तिमत्त्व विकसन, व्यावहारिक कौशल्ये, स्त्री-पुरुष संपूरकता, शारीरिक-मानसिक-सामाजिक आरोग्य या मुद्द्यांबरोबरच चालू घडामोडींवर आधारित विषय मांडले जातात.

व्याख्यान, गटचर्चा, कार्यशाळा आणि संस्थाभेट असे बैठकीचे स्वरूप असते. गरजेनुसार ऑनलाइन/दूरस्थ पद्धतीने देखील बैठका घेतल्या जातात. संवादिनी सदस्यांबरोबरच असे वेगळे विषय ऐकण्याची आवड आहे अशा पुरुषांचेही मासिक बैठकीत स्वागत आहे.

संगीता हांडे ९९६०८९२५०७

### २) उमलत्या वयाशी जुळवून घेताना...

पौगंडावस्थेतील मुलांना त्यांच्यामध्ये घडणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांबाबत विज्ञाननिष्ठ माहिती मिळणे गरजेचे आहे, हे सर्वमान्य आहे. शालेय शिक्षणात लैंगिक विकासाच्या योग्य व तंत्रशुद्ध शिक्षणाचा अभाव आहे. यासंबंधी असलेली भीती आणि सामाजिक दडपणामुळे मुलांना योग्य पद्धतीने कुतूहलशमनाची संधी मिळत नाही. अनेक प्रकारच्या अवाजवी, अवास्तव व शास्त्रीय माहितीचा भडिमार यामुळे मुलांची अवस्था गोंधळलेली असते. वयात येण्याच्या व तरुणाईच्या टप्प्यावरही मुलांना त्यांच्यावरील बौद्धिक, भावनिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे; त्यांच्यामध्ये निर्माण होणारी 'स्व'ची जाणीव – स्वप्नातून वास्तवाकडे अलगद नेणे गरजेचे आहे. त्याच बरोबरीने स्त्री व पुरुष दोघांनीही परस्परांविषयी आदरभाव व माणुसकीचा दृष्टिकोन जपणे गरजेचे आहे. यासाठी 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना'... या गटातर्फे 'लैंगिकता व लिंग समभाव प्रशिक्षण कार्यशाळा' आयोजित केल्या जातात. यासाठी गटाने दहा विषयांवरील प्रशिक्षण हस्तपुस्तिका संच तयार केला आहे.

***विविध वयोगटांसाठी घेतले जाणारे उपक्रम /कार्यशाळा**

१. उमलत्या वयाशी जुळवून घेताना.. इ. ८वी ते १०वी विद्यार्थ्यांसाठी

२. तरुणाईची आव्हाने – इ. ११वी ते द्विपदवीधर विद्यार्थी

३. सहजीवनाच्या उंबरठ्यावर– विवाहोत्सुक गटासाठी

४. बहर जोपासताना– वयात येणाऱ्या मुलांच्या पालकांसाठी

५. प्रशिक्षक प्रशिक्षण– या अभियानात सामील होण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी

विशाखा वेलणकर – ९८५०६३८४८२

### ३) समतोल

सातत्याने २५ वर्षांहून अधिक काळ प्रकाशित होणारे 'समतोल' हे द्वैमासिक असून एका वर्षात दिवाळी अंकासह सहा अंकांचे प्रकाशन होते. प्रत्येक अंकासाठी वेगळा सूत्रविषय असतो. यामध्ये प्रथितयश, नवीन लेखकांबरोबरच संवादिनी सदस्यांना अभिव्यक्तीची संधी दिली जाते. स्त्रीशक्ती प्रबोधनच्या उद्दिष्टांना धरून अंकाचे विषय ठरत असल्याने संघटन वाढण्यासाठी मदत होते. समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन केले जाते.

विचारांना चालना देणारे साहित्य असलेल्या ह्या अंकाच्या विषय निवडीपासून वितरणापर्यंत सर्व जबाबदारी संवादिनी सदस्य घेतात. समतोलच्या कामावर, अनेक राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांच्या रूपाने यशाची मोहोर उमटली आहे.

अपर्णा चितळे – ९२२५३१६४२४

### ४) विद्याव्रत संस्कार

१२ ते १५ या किशोरवयीन वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आयुष्याचे ध्येय ठरविण्यासाठी संस्कारांच्या माध्यमातून सुयोग्य मार्गदर्शन करणे, हा या गटाचा हेतू आहे. या संस्कारांची पूर्वतयारी म्हणून व्यक्तिमत्त्व विकसनाला पूरक अशा सहा विषयांवर सत्रे घेतली जातात. यात प्रस्तावना, शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक विकसन आणि व्रतोपासना अशा सहा व्याख्यानांचा समावेश असतो. परस्पर संवादात्मक चर्चा, कृतिखेळ, गोष्ट, रोल प्ले, तक्ते, बौद्धिक खेळ, वादविवाद इ.च्या साहाय्याने विषय मांडणी केली जाते. शहरी वस्त्या, ग्रामीण भाग, निमशहरी आणि शहरी भाग अशा विविध ठिकाणच्या शाळांमध्ये सत्रे घेतली जातात. विद्याव्रत संस्कार हा पूर्णत: शैक्षणिक संस्कार असून सर्व सामाजिक गटांसाठी योजला जातो. मे महिन्यामध्ये व्रतोत्सुक विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी प्रबोधिनीमध्येच आठ दिवसांचे शिबिर घेतले जाते व नंतर संस्कार केला जातो.

२०१८ पासून विद्याव्रतींसाठी वर्षभर 'जोपासना सत्रे'ही सातत्याने घेतली जात आहेत. यामध्ये विविध अनुभव शिक्षणात्मक सत्रांचा समावेश असतो.

मुग्धा पाटील – ९८५०९९४७२६

### ५) पालवी

वंचित गटातील विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी, या हेतूने या उपक्रमाद्वारा अभ्यासपूरक कृती कार्यक्रम घेतले जातात. निरीक्षण, श्रवण, स्मरण आणि वर्गीकरण या मूलभूत क्षमता शालेय शिक्षणासाठी विकसित करणे खूप गरजेचे असते. या चार मूलभूत अध्ययन क्षमतांवर आधारित अभ्यासपूरक कृतिखेळ, शिबिरे, गंमत खेळ अशी माध्यमे वापरली जातात. तासिका घेताना मुलांच्या प्रतिसादाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. ५ वी ते ७ वी या वयोगटातील मुलांसाठी हा गट प्रामुख्याने काम करतो.

सुनीता करंदीकर – ९४०३१८५८७७